Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-XII Dec. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका

प्रा. उदयकुमार. ना. लाड
श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज
माळवाडी – कोतोली,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**प्रस्तानवा :**

भारतीय स्त्रियांमध्ये बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, सृजनशीलता व कष्ट करण्याची धमक इत्यादींबाबत पुरुषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमतरता नसताना तिला पुरुषापेक्षा कमी लेखण्याची वृत्ती आज एकविसाव्या शतक आले तरी कायम आहे. हाच स्त्रियांवरील मूलभूत अन्याय आहे. आजही पुरुषप्रधान समाज रूढ असून, स्त्रीचा दर्जा पुरुषाच्या तुलनेत गौण मानला जातो. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता आहे. तिचा तो वाटेल तसा विनियोग किंवा वापर करू शकतो, ही मालकी हक्काची अमानुष भावना अद्यापही दिसून येते.

इतकेच नव्हे तर इ.स. १९५० मध्ये भारताने स्वीकारलेल्या राज्यघटनेत महिलांना पुरुषाच्या बरोबरीने समान हक्क, समान दर्जा व समान संधी देण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक व धार्मिक अशा सर्वच क्षेत्रांचा समावेश होतो. असे असले तरीही स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ६५ वर्षांत स्त्रियांना मतदानाचा हक्क व शैक्षणिक क्षेत्रातील स्वातंत्र्य वगळता फारसे महत्त्व दिले नाही. राजकीय क्षेत्रात तर महिलांच्या प्रवेशास सर्व सामान्य घटकांतून विरोधच दर्शविला जातो. भारतीय लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण जवळपास ५० टक्के असूनही महिलांचा सर्वच क्षेत्रांतील सहभाग पाहता फारच कमी प्रमाणात दिसून येतो. साहजिकच भारतीय विकासातील स्त्रियांचा सहभाग हा संशोधनाचा विषय महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणासाठी/सबलीकरणासाठी फारसे प्रयत्न झालेले दिसून येत नाहीत, ही एक बाब चिंतनीय आहे. त्यामुळे स्त्रियांची भूमिका तपासून पाहणे गरजेचे आहे.

**उद्दिष्टे :**

१. स्त्रियांच्या पारंपरिक भूमिकांचा आढावा घेणे.
२. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचा दर्जा समजून घेणे.
३. सक्षमीकरणामुळे स्त्रियांना मिळालेले लाभ समजून घेणे.
४. आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका समजून घेणे.
५. स्त्रियांच्या विकासातील अडथळे समजून घेणे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. या शोधनिबंधासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, तज्ज्ञांचे शोधनिबंध व इंटरनेट इत्यादींमधून माहितीचे संकलन करून प्रस्तुत लेख तयार केला आहे.

**शोधनिबंधाचे महत्त्व :**

भारताच्या एकूण लोकसंख्येचा विचार करता त्या लोकसंख्येचा विचार करता त्या लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या स्त्रियांची असलेली दिसून येते. परंतु, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचा विकास म्हणावा तेवढा झालेला नाही.

एकूणच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्राचा विचार करता स्त्रियांचे या क्षेत्रातील प्रमाण फार कमी असलेले दिसून येते. त्यामुळे आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका समजून घेताना असे दिसून येते की, स्त्रिया सक्षम असूनसुद्धा त्यांना संधी दिली जात नाही. याचा परिणाम म्हणून स्त्रियांचा मागासलेपणा, आर्थिक दुर्बल व पुरुषावर अवलंबून राहून जीवन जगावे लागते. या सर्व गोष्टींचा विचार करता देशाची प्रगती व्हावयाची झाल्यास स्त्रियांचीही प्रगती होणे गरजेचे आहे. म्हणून या विषयावर चिंतन होणे गरजेचे आहे. तसेच महत्त्व समजून घेणे जरूरीचे आहे.

**आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका :**

विकासाची प्रक्रिया केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित राहात नाही, तर या प्रक्रियेतून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक बदल घडून येतो. एकूण व्यक्तीच्या जीवनशैलीवर याचा परिणाम दिसून येतो. साहजिकच हा विकास पुरुषाबरोबर स्त्रियांचाही होणे गरजेचे आहे आणि म्हणूनच आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका महत्त्वाची आहे, हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

**१. स्त्री शिक्षणातून प्रगती :**

आपण समाजात मोकळेपणाने स्वतंत्ररीत्या वावरण्यासाठी साक्षर असणे अत्यंत जरूरीचे आहे. आपल्याला अक्षर ओळख असली पाहिजे. त्यासाठी किमान शालेय शिक्षण मिळाले पाहिजे. आपण शिकल्यामुळे आपले कुटुंब शिकू शकते. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजू लागले तसेच त्यांच्यामध्ये शिक्षणाचा नवा दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम क्रांतिजेयती सावित्रीबाईंनी रुजविले. त्यामुळे आजची स्त्री शैक्षणिक प्रगतीमध्ये आघाडीवर असलेली दिसून येते. उदा. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी, सुवर्णकन्या पी. टी. उषा, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, अशा भोसले, उषा मंगेशकर व गगनभरारी घेणाऱ्या कल्पना चावला इत्यादी होत. इतकेच नव्हे तर आज स्त्रिया अभियांत्रिकी तंत्रज्ञान, स्थापत्यशास्त्र, संगणकीय शिक्षण, संपर्क साधने, नवीन व्यवसायात पदार्पण, उच्च दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. वर्तमान स्थितीत महिलांचा सहभाग सर्व क्षेत्रांत व्यापकतेने होत असलेला दिसून येतो.

**२. स्त्रियांमध्ये धाडस निर्माण झाले :**

ग्रामीण स्त्रियांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता आणि नवनवीन गोष्टींसंदर्भातील त्यांचे अपुरे ज्ञान हे त्यांच्या कर्तृत्वाला अडसर ठरते, शिवाय कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बंधने अनेकदा तिला जखडून ठेवतात. अशा परिस्थितीत घराबाहेर पाऊल टाकून काहीतरी करून दाखवावे, ही जिद्द तिच्यामध्ये निर्माण झाली.

आजच्या आधुनिक स्त्रिया काही प्रमाणावर स्त्री-पुरुष समता गृहित धरत आहेत. जागतिकीकरणाच्या अंगाने जे अनेक प्रश्न स्त्री अस्तित्वासाठी निर्माण झालेले आहेत. उदा. 'सेझ'विरोधी लढा, अभयारण्य, विविध प्रकल्प, कारखाने व औद्योगिक प्रकल्प इत्यादी लढ्यांमध्ये स्त्रियांचे नेतृत्व लक्षणीय वाढत आहे. इतकेच नव्हे तर नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांचा नर्मदा बचाव लढा आजही प्रेरणादायी ठरत आहे.

**३. स्त्रियांची राजकीय क्षेत्रातील प्रगती :**

स्त्रियांना राजकीय सत्तेत आरक्षण मिळाल्यामुळे स्थानिक पातळीवरील ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, राष्ट्रपती व पंतप्रधान अशा विविध राजकीय क्षेत्रांतील सर्वच पदांवर काम करीत असलेल्या दिसून येतात. यातूनच स्त्रियांची संघटित शक्ती दिसून येते. त्यामुळे त या आज आपले प्रश्न, समाजाचे विविध प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या या राजकीय क्षेत्रातील प्रवेशामुळे त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार व पिळवणूक यांवार आवाज उठवित आहे. ही प्रगती दिसून येते.

**४. आर्थिक आणि सामाजिक प्रगती :**

स्वयंसहाय्यता गट व बचत गटाच्या माध्यमातून स्त्रियांनी आपली आर्थिक प्रगती करून घेतली आहे. त्यातूनच लघुउद्योग व कुटिरोद्योग सुरू केले. त्यांना त्यातून नफा मिळू लागला. त्यामुळे त्यांना एक नवं आयुष्य मिळालं. साहजिकच स्त्रियांना घरामध्ये एक वेगळे स्थान मिळाले. आपणसुद्धा घर चालवून शकतो, याची जाणीव त्यांच्यात निर्माण झाली.

तसेच आज स्त्रिया शिक्षिका, प्राध्यापिक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर इतकेच नव्हे तर पोलिस दल व सैन्य दल या क्षेत्रांमध्ये जाऊन पैसा मिळवित आहेत. साहजिकच त्यांची सामाजिक प्रगतीसुद्धा झालेली दिसून येते.

**५. स्त्रियांची शारीरिक कष्ट करण्याची तयारी :**

काही मागास समाजातील स्त्रियांना प्रचंड शारीरिक कष्ट करावे लागतात. कारण, लाखोंच्या संख्येने आजही देशामध्ये निरक्षण स्त्रिया आहेत. मग ग्रामीण भागातील स्त्री, आदिवासी समाजातील स्त्री किंवा शहरातील झोपडपट्टीत राहणारी स्त्री असो, या स्त्रियांना प्रचंड कष्टाची कामे करावी लागतात. काही स्त्रिया दगडाच्या खाणीमध्ये काम करतात. काही स्त्रिया पत्रा, काच, प्लास्टिक (भंगार) गोळा करतात, तर काही स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने ऊस तोडणीचे काम करतात. हे विदारक चित्र समोर येताच, स्त्रियांच्या जीवनातील संघर्ष दिसून येतो.

**६. स्त्रित्वाची जाणीव :**

स्त्रियांमध्ये सहनशीलता फार मोठ्या प्रमाणात असते. परंतु, तिला नाहक त्रास कोणी दिला, तर ती कधी झाशीची राणी, तर कधी दुर्गादेवीची भूमिका बजावत असते. आजची स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नसल्याचे दिसून येते. पुरातन संज्ञेप्रमाणे आजची स्त्री अबला राहिली नसून, कौटुंबिक व सामाजिक अत्याचाराविरोधी आवाज उठवून आपल्या स्त्रित्वाची जाणीव निर्माण करीत आहे. हा एक तिच्यामधील बदल दिसून येतो.

**स्त्रियांच्या सबलीकरणातील/सक्षमीकरणातील अडथळे :**

१. ग्रामीण समाजातील स्त्रीला कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळून घराबाहेर पाऊल टाकणे अशक्य वाटे. घरकाम, स्वयंपाक, मुलांचे संगोपण, सणवार व धार्मिक कार्ये इ. कामांतून संधी मिळूनही सामाजिक, राजकीय क्षेत्रांत पूर्ण मानसिक सामर्थ्यानिशी ती काम करू शकत नाही. कारण, तिच्या मनामध्ये घराकडे व मुला-बाळांकडे दुर्लक्ष तर होणार नाही का? असे विविध प्रश्न निर्माण होत असतात.

२. सरपंदपदी निवडून आलेल्या महिला जेव्हा सरकारी योजनांची माहिती करून घेऊ लागल्या, गरजू महिलांना त्यांचे लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करू लागल्या. अधिकाऱ्यांना प्रश्न विचारू लागल्या. तेव्हा लोकांना अशा महिलांची अडचण भासू लागली. त्यातूनचद त्यांची चेष्टा करणे, शिव्या देणे असे प्रकार सुरू झाले. अशा मानहाणीमुळे सत्तेतील स्त्रियांचे प्रमाण फारसे वाढत नाही, असे दिसते तर काही ठिकाणी स्त्री सरपंच म्हणून नावालाच असतात. त्यांचा सर्व कारभार त्यांचे पतीच सांभाळत असतात. असे चित्र ग्रामीण भागात दिसून येते. हा एक स्त्रियांच्या प्रगतीतील मोठा अडथळा दिसून येतो.

३. स्त्रियांना सरकारी कामकाजाची पुरेशी माहिती नसते. त्यांना कायद्यांविषयी अज्ञान असते. असा पक्का समज लोकांमध्ये असतो. त्यातूनच स्त्रियांना मानहानी सहन करावी लागते.

४. स्त्रियाकंडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप असल्याचे दिसत नाही. शिवाय एखाद्या कुटंबातील स्त्री आपल्या कर्तृत्वाने राजकीय क्षेत्रात यशस्वी होऊ लागली की, तिच्या पतीचा पुरुष अहंकार जागा होतो. त्यातूनच तिला विरोध केला जातो. साहजिकच आजही पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव कमी झालेला दिसून येत नाही.

५. अजूनही काही स्त्रियांना सक्षमीकरणाचे महत्त्व माहीत नाही. तसेच आपण एकत्र येऊन बदल घडवू शकतो. ही जाणीव त्यांना झालेली नाही. याशिवाय स्त्रियांचे संघटित स्वरूप, निरक्षरता, राजकारणातील गुन्हेगारी व स्त्रियांवरील नैसर्गिक मर्यादा इत्यादींमुळे गुणवत्ता असूनही व्यवसायात संधीचा अभाव दिसून येतो.

**सारांश :**

आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका समजून घेताना असे दिसून येते की, भारतीय स्त्री आता एका नव्या स्वरूपात जगासमोर येत आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञान व भौतिकवादी संस्कृतीत स्त्रियांवरील बरीच पारंपरिक बंधने मोडून निघत आहेत. आज स्त्री बंधमुक्त होत आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला नवे आयाम प्राप्त होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ती घरापासून ते कामाच्या ठिकाणापर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन ती अधिकाधिक स्मार्ट होत आहे. अनेक सॉफ्ट स्कील तिने अवगत केलेली आहेत. जगातल्या सर्वात मोठ्या कंपनीच्या सी.ई.ओ. महिला बनत आहेत, यशस्वी उद्योजक होत आहेत.

वरील बाबींचा विचार करता हे सर्व प्रगतीचे आलेख फक्त हाताच्या बोटावर मोजता येतील. इतक्यात स्त्रियांच्या बाबतीत घडत आहे. कारण, स्त्रियांच्या एकूण लोकसंख्येचा विचार करता अजूनही स्त्रिया मागासलेले जीवन जगताना दिसत आहेत. त्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. राजकारणातील सहभाग कमी आहे. औद्योगिक क्षेत्रातील प्रमाण कमी आहे. त्यामुळे साहजिकच आधुनिक भारताच्या विकासातील स्त्रियांची भूमिका फार नगण्य आहे. म्हणजेच कमी असलेले दिसून येते. ती वाढविण्यासाठी तिच्या सबलीकरणातील अडथळे दूर केले पाहिजेत आणि तिला पुरुषाच्या बरोबरीने मान-सन्मान मिळाला पाहिजे, तरच ती भारताचे उज्ज्वल भवितव्य घडवू शकेल.

**निष्कर्ष :**

१. आजही स्त्रीला पुरुषाच्याच बरोबरीने समाजात स्थान नाही.
२. मागास समाजातील स्त्रियांचा विकास झालेला नाही.
३. स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण कमी आहे.
४. राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग नाही.
५. स्त्रियांची आर्थिक क्षेत्रातील प्रगती म्हणावी तेवढी झालेली नाही.
६. स्त्रियांचे सक्षमीकरण मोठ्या प्रमाणात झाले नाही.

**संदर्भ सूची :**

१. स्त्री चळवळ : नवे परिणाम हवे, आंदोलन विशेषांक, १९९८, लता प्रतिभा मधूकर.
२. समर्थ महिला : समर्थ भारत, योजना अंक, ३ ऑक्टोबर, २००८.
३. स्त्री सबलीकरण : समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद.
४. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचा मागोवा; घनश्याम शहाअनु. प्राची चिकटे.
५. महिला दिन विशेषांक, फेब्रुवारी २००८, प्रबोधन प्रकाशन ज्योती.
६. जागतिकीकरणातील भारतीय स्त्रीची बदलती भूमिका; योजना मासिक, अंक ११ जून, २००१, प्रा. व्ही. डी. गायकवाड.
७. भारतीय स्त्री : एक मागोवा; योजना मासिक अंक, ९ एप्रिल, २००९, चंदना देवकर.

८. ग्रामीण समाजशास्त्र : प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. पी. व्ही चांदोरकर.
९. भारतातील सामाजिक समस्या : प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. विजय मारुलकर.
१०. भारतीय समाज संरचना व परिवर्तन : प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. विजय मारुलकर.
११. http://www.gobalmarathi.com/htm.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com